# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०८/०७/२०२०

## मा. विशेष स्थायी समिती सभा

## सभा सूचना क्र. ०४

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ..........................................................
स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा गुरुवार दि. ०९/०७/२०२० रोजी दुपारी १२.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०४ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. ०९/०७/२०२० सभा सुचना क्र. ०४ विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| २४ | कोरोना नियंत्रणासाठी वैद्यकीय व इतर बाबी खरेदीसाठी आयुक्तांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" मधील प्रकरण ५ कलम (२) (२) अंतर्गत प्राधिकृत करणेबाबत. |
| २५ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकरीता आवश्यक औषधे, सर्जिकल मटेरियल, लॅब मटेरियल खरेदी करणेकामी मागविण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेबाबत. |
| २६ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकरीता आवश्यक डासनाशके व अळीनाशके खरेदी करणेकामी मागविण्यात आलेल्या निविदांचे दर मंजूर करणेबाबत. |

दिनांक :- ०८/०७/२०२०

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सचिव विभाग

विशेष
**मा.स्थायी समिती सभा दि.०८/०७/2020**

## ॥ गोषवारा ॥

**प्रकरण क्र. २४ :- कोरोना नियंत्रणासाठी वैद्यकीय व इतर बाबी खरेदीसाठी आयुक्तांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड मधील प्रकरण 5 कलम (2) (2) अंतर्गत प्राधिकृत करणेबाबत.**

महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रार्दुभाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम, 1897 ची दि.13/03/2020 रोजी अंमलबजावणी सुरु केलेली आहे. त्यामधील खंड 2, 3 व 4 नुसार राज्यात कोरोना विषाणूमुळे (कोव्हिड 19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगांचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी “महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020” दिनांक 14/03/2020 च्या अधिसूचनेने लागू करण्यात आले आहेत.

वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड 2(1) नुसार आयुक्त, आरोग्य सेवा, संचालक, आरोग्य सेवा 1, संचालक, आरोग्य सेवा 2 संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, सर्व विभागीय आयुक्त महसुल विभाग, सर्व जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करुन त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आले आहे.

महापालिका कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. तरी कोव्हीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी वैद्यकीय व इतर बाबींची उपलब्धता अत्यंत तातडीचे होणे आवश्यक आहे. त्याकरिता कोव्हीड 19 च्या नियंत्रणाकरिता काही वैद्यकीय व इतर बाबी निविदेशिवाय थेट खरेदी करणे आता आवश्यक झाले आहे.

याकरिता कोव्हीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी वैद्यकीय व इतर बाबींची उपलब्धता तातडीने होण्यासाठी शासन निर्देशानुसार किंवा इतर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी त्या निविदेशिवाय थेट खरेदी करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड मधील प्रकरण 5 कलम (2) (2) अंतर्गत आयुक्तांना प्राधिकृत करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**(संभाजी वाघमारे)**
**उपायुक्त (वैद्यकीय)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**